# प्रकरण तिसरे

# 'एका साळियाने' या आत्मचरित्राची सामाजिकता

साहित्य आणि समाज यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. संपूर्ण मराठी साहित्याचा आढावा घेता त्या साहित्यामध्ये त्या त्या काळातील सामाजिक परिस्थितीचे चित्रण झाल्याचे आढळते. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक समाज सुधारकांनी समजातील अनिष्ट चाली, रीती, परंपरांवर प्रहार करण्यासाठी साहित्याचा आधार घेतल्याचे जाणवते. लेखक हा समाजात जन्मतो, वाढतो. लेखक ज्या समाजात वाढतो त्या समाजाचा परिणाम त्याच्या साहित्यकृतीवर होत असतो. कवी कवितेतून, नाटककार नाट्यातून, शाहीर शाहीरीकाव्यातून आपल्या समाजातील चांगल्या वाईट गोष्टींचे चित्रण करीत असतात. मणुष्याची जडण-घडण ज्या समाजात होते त्या समाजाच्या संस्कृतीचा प्रभाव त्याच्यावर झालेला असतो. परिणामी ज्यावेळी साहित्यिकाकडून 'साहित्यकृती' निर्माण होते. त्यावेळी त्याच्या समाज संस्कृतीचा प्रभाव त्याच्या साहित्यकृतीवर स्वाभाविकता पडत असतो. मराठीतील 'आत्मचरित्र' हा वाङ्मयप्रकार अभ्यासता त्यावरील सामाजिक, सांस्कृतिक प्रभाव सहजपणे दिसून येतो. दलितांच्या आत्मकथनांकडे पाहता त्यांनी आपल्या समाजातील 'दु:ख', 'वेदना', 'अन्याय', 'अत्याचार' तसेच त्यांच्या संस्कृतीचे चित्रण केल्याचे दिसून येते. स्त्रियांनी आपल्या आत्मचरित्रातून त्यांच्यावर लादली जाणारी सामाजिक बंधने, आणि त्यांच्यावर होणारे अत्याचार याचे चित्रण केले आहे. लक्ष्मीनारायण बोल्ली यांनीही 'एका साळियाने' या आत्मचरित्रात स्वत:च्या जडणघडणीबरोबर आपल्या साळी समाजाचे, आणि समाज संस्कृतीचे वास्तव चित्रण केले आहे. याचाच आढावा प्रस्तुत प्रकरणात घ्यावयाचा आहे.

## १) साळियांचे जीवनदर्शन :

'एका साळियाने' या शीर्षकावरूनच लक्ष्मीनारायण बोल्लींच्या या आत्मचरित्रामध्ये 'साळी' समाजाचे चित्रण झाले असेल याचा आंदाज येतो. ''वस्त्रोद्योगात 'सनगर', 'कोळी', आणि 'साळी' अशा विणकरांच्या जाती आहेत. घोंगडी कांबळीसारखे जाडे भरडे वस्त्र अर्थात 'सणंग' जे विणतात ते सणगर किंवा सनगर. धोतरं, पागोटे यासारखी सुती मांजरपाट वस्त्रे जे विणतात ते कोळी. आणि जरी, 'रेशमी' साड्या यासारखी 'तलम' वस्त्रे व नक्षीदार चादरी जे विणतात ते 'साळी' ''[१] एका साळियाने या आत्मचरित्रातील 'साळी' हे मूळचे आंध्रप्रदेशातील तेलंगणातील आहेत. शंभर-दीडशे वर्षापूर्वी तेलंगणात भीषण दुष्काळ पडला होता. या दुष्काळात साळ्यांचं जगणं कठीण झालं. तसेच तेलंगणातील दोरा, रेड्डी, वेलमा, भूस्वामी, पटेलु या जमीनदारांनी तेलुगू पद्मशाली समाजाच्या जमीनी हडप केल्या होत्या. तेलंगणातील प्रत्येक गावात या जमीनदारांची हुकमी राजवट होती. जमीनदारांनी अनेक साळ्यांचा अमानुषपणे छळ केला. या अत्याचाराला घाबरून तेलुगू साळी समाज तेलंगणातून सोलापूरला आला. आपल्या कष्टाच्या जोरावर हा समाज सोलापूरात स्थायिक झाला.

तेलुगूमध्ये साळ्यांना साले असे म्हणतात. हे साळीलोक स्वत:ला पद्मब्राम्हण समजतात म्हणून त्यांना 'पद्मशाली' असेही म्हणतात. हे पद्मशाली मुंज करतात, यज्ञयाग करतात तसेच मांसाहार आणि मद्यसेवन करतात. 'श्री मार्कंडेय महर्षी' हे त्यांचे कुलपुरूष आहेत. सप्तर्षींतले भृगुऋषी हे त्यांचे मूळपुरूष आहेत. फार वर्षापूर्वी 'पद्मशाली' ब्राम्हणांनी तेलंगणातील 'तलपीठाराजु' या क्रूर राजाचा वध केला. हा राजा लोकांची 'मुंडकी' पायाखाली घेत होता. राजाचा वध करण्यासाठी पद्मब्राम्हणांना शाक्तपंक्षाचा स्वीकार करावा लागला. शक्तीची आराधना करण्यासाठी त्यांना मांस आणि मद्याचे सेवन करावे लागत होते. तेव्हापासून 'पद्मशाली' मांस आणि मद्याचे सेवन करू लागले. या शाक्तपंथ स्वीकारलेल्या साधकातून 'साधनासुरूलु' नावाचा दुसरा पंथ निर्माण झाला. ''हे

लोक दैवीशक्तीच्या ताकदीवर नजरबंदीचे खेळ प्रदर्शित करतात. ते भरदुपारी भल्यामोठ्या चौकात आपला खेळ मांडतात. ही मंडळी पद्मशालीयांच्याखेरीज अन्य कोणाकडे भोजन स्वीकारीत नाहीत.''[२] यावरून पद्मशाली समाजातही जातीभेद पाळत असल्याचे जाणवते.

साळी समाज अत्यंत कष्टाळू आहे. 'एका साळियाने' या आत्मचरित्राच्या पानापानातून साळ्यांच्या कष्टाचा प्रत्यय येतो. साळी लोक कामधंद्याला खूप महत्त्व देतात. तेलुगूमध्ये कामधंद्याला ते 'पनीपाटा' म्हणतात. ''पनी म्हणजे काम आणि पाटा म्हणजे गाणं.''[३] प्रत्येक साळी हातमागावर काम करताना धोट्याच्या आवाजाच्या तालावर गाणं म्हणतो. तर स्त्रिया चरख्यावर कांड्या भरताना त्याच्या आवाजाच्या तालावर गाणं म्हणतात. गाणं म्हटल्यामुळे कामाचा ताण जाणवत नाही असे त्यांना वाटते. साळीवाड्यातील प्रत्येक हातमागावरील साळ्यांच्या गाण्याने संपूर्ण साळीवाड्याला गाण मैफिलीचे स्वरूप प्राप्त होत होते. साळी लोकांच्यामध्ये गाणं इतकं मुरलं आहे की, ते आलेलं पत्रही वाचत नाहीत तर गातात. यावरून असे म्हणता येते की ''गाणं हा तेलुगू लोकजीवनाचा भावस्वर आहे.''[४]

पद्मशाली तेलुगू समाज दीडशे वर्षापूर्वी तेलंगणातून सोलापूरात आला तरी त्याने आपली 'तेलंगणी संस्कृती' विसरली नाही. साळ्यांच्या घरांची रचना तेलंगणी पद्धतीचीच आहे. प्रत्येक साळ्यांच्या घरात खड्डा माग आहेत. चार, सहा, आठ, दहा अशा हातमागांच्या संख्येनुसार त्यांचे वाडे बांधले आहेत. प्रत्येक घराच्या भिंतीचा खालचा भाग ते कावाने रंगवतात. कावाला तेलुगूमध्ये ते 'जाजू' म्हणतात. रंगवलेल्या भिंतीवर चुन्याने 'तीनेलु' काढतात. शैव सांप्रदायातील साळी आपल्या घरांवर चुन्याचे ठिपके देतात. तर वैष्णव सांप्रदायातील साळी भिंतीवर काडीने चुन्याचे नाम ओढतात. या भिंतीवर, दारांवर काढलेल्या चुन्याच्या नक्षीकामाला 'तीनेलु' असे म्हणतात. घरासमोर शेणाने सारवून त्याच्यावर तेलंगणी मुग्गुलु (रांगोळ्या) काढतात. तसेच उंबऱ्यावर गोपद्म आणि लक्ष्मीची पावले काढतात.

पद्मशाली स्त्रिया तेलंगण पद्धतीने साड्या नेसतात. कमरेला चांदीचा पट्टा, नाकात नथ, गळ्यात सोन्याचा नाजूक पट्टा, दंडावर दंडकडेलु (वाक्या), हातात पाटल्या, पायात चांदीच्या साखळ्या, केसात शिकेपुत्वु (तेलंगणी पद्धतीचे सोनेरी फूल) आणि वेणीला अबोलीच्या फुलांचा भरगच्च गजरा असा तेलंगणी थाट साळी स्त्रिया करतात. पद्मशाली पुरूष कमरेला धोतर नेसतात. कमरेपासून वरचे शरीर उघडेच असते. घरातून बाहेर जायचे असेल तर डोक्याला रूमाल आणि खांद्यावर उपरणं घेतात.

पद्मशाली समाजाच्या आहारात तेलंगणी पदार्थांची रेलचेल असते. नेहमीच्या जेवणात पप्पू आणि पच्चिपुलुचु हे पदार्थ असतात. पप्पू म्हणजे फिक्की डाळ आणि कांद्याचे बारीक तुकडे, मिरच्यांच्या बियांची फोडणी दिलेली चिंचेची आनटी म्हणजे पच्चिपुलुचु. जेवताना ताटाला आंबा, लिंबूचे लोणचे असते. तसेच आंबडीच्या भाजीपासून खास तेलंगणी पद्धतीने केलेले लोणचे ज्याला तेलुगूमध्ये गोंगुरा पच्चडी म्हणतात ते लोणचे असते. सर्व लोणची नसली तरी चालते पण ''पात्रात गोंगुरा पच्चडी नसल्यास अन्नाला हातही न लावणारी माणसही आहेत.''[५] रात्रीच्या जेवणात मसाला पप्पू करतात. मसाला पप्पू म्हणजे मसाला घालून केलेली डाळ. प्रत्येक जेवणाच्या शेवटी ''दहीभात खाल्याशिवाय तेलुगू माणूस पानावरून उठत नाही.''[६] आजही तेलुगू पद्मशाली समाजातील घराघरात तेलुगू पद्धतीचेच जेवण केले जाते.

## २) विवाह पद्धती :

विवाह हा मानवाच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा विधी आहे. प्रत्येक धर्मात विवाहाला महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसून येते. प्रत्येक धर्मात विवाहाच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. तसेच प्रत्येक धर्मातील जाती, जमातींनुसार या पद्धती वेगवेगळ्या असल्याचे दिसून येते. 'एका साळियाने' या आत्मचरित्रातील साळी समाज हिंदू आहे.

साळी वाड्यातील विवाह हे हिंदू धर्मशास्त्रानुसार होतात. पद्मशाली समाजामध्ये विवाहाच्या काही पद्धती आहेत.

## २.१ बाल विवाह :

भारतामध्ये फारपूर्वीपासून बाल विवाहाची पद्धत रूढ होती. अगदी लहान वयात म्हणजे पाच ते दहा वयोगटातील मुलांची लग्न केली जात होती. काही ठिकाणी तर अगदी पाळण्यात लग्नं लावली जात होती. साळी समाजातदेखील बाल विवाहाची पद्धत रूढ होती. लक्ष्मीनारायण बोल्लींचे वडील इरय्या बोल्ली लग्नाच्या वेळी २० वर्षांचे होते; तर त्यांची आई मल्लव्वा ९ वर्षांची होती. तसेच लक्ष्मीनारायण बोल्ली यांचा पहिला विवाह सोळाव्या वर्षी झाला. तेव्हा त्यांची पत्नी भूलक्ष्मी बारा वर्षांची होती. यावरून लक्षात येते की साळी समाजात मुलांना लग्नाचा अर्थही न कळण्याच्या वयात त्यांची लग्न केली जात होती. लक्ष्मीनारायण बोल्ली यांच्या पत्नीचे लग्नातील वय पाहता साळी समाजामध्ये स्वातंत्र्योत्तर काळात मुलींच्या लग्नाचे वय वाढल्याचे दिसते. म्हणजे साळी समाजाने स्वातंत्र्योत्तर काळात आधुनिकतेचा स्विकार केल्याचे स्पष्ट होते. साळी समाजात मुला-मुलींच्या पसंती नापसंतीचा विचार केला जात नव्हता. लग्न ठरवण्याचे काम घरातील कर्तीमंडळी करत होती. साळी वाड्यातील सर्व विवाह वैदिक पद्धतीने होतात. लग्नामध्ये जेवणात प्रथम लापशी हा गोड पदार्थ वाढतात. या लापशीबरोबर आळुची भाजी वाढतात. हे गोड पदार्थ खाल्यानंतर पांढरा किंवा मसाला भात आणि तेलंगणी चारू वाढला जातो. चारू म्हणजे खास तेलंगणी पद्धतीने केलेली आमटी असते. ही आमटी खास लग्नसमारंभासाठीच बनवली जाते. लग्नामध्ये गरीब श्रीमंत असा कोणताही भेद केला जात नाही. सर्व थरातील लोकांना मंडपात जमीनीवर कापडी पट्टया अंथरून एकत्र पंगती बसवतात. यावरून साळी समाजातील एकीची आणि आपुलकीची भावना दिसून येते.

## २.२ मारमानम लग्नम :

हिंदू धर्मामध्ये विधवांना पुनर्विवाह करण्यास बंदी होती. विधवांना पतीच्या मृत्यूनंतर सती जावे लागत होते. ब्राम्हण समाजात स्त्रियांचे केस कापून त्यांना विद्रुप करण्याची पद्धत होती. विधवांना सण-समारंभांमध्ये जाण्यास बंदी होती. विधवा स्त्रियांना अंधाऱ्या खोलीत आपलं उर्वरीत आयुष्य घालवावे लागत होते. साळी समाजातील लोक पद्मशाली ब्राम्हण होते. पण त्यांनी विधवांच्या बाबतीत अशा कोणत्याही जाचक पद्धतीचा स्वीकार केला नाही. साळी समाजात हजारो वर्षापासून विधवा विवाह रूढ असल्याचे दिसून येते. या विधवा विवाहास तेलुगू पद्मशाली 'मारमानम लग्नम' असे म्हणतात. साळी समाज स्वत:ला ब्राम्हण समजत असतानादेखील विधवा विवाहास मान्यता होती. म्हणजे साळी समाजाने विधवा विवाहाच्या बाबतीत फार पूर्वीपासून क्रांती केल्याचे दिसून येते.

## २.३ हुडकी लग्नम :

साळी समाजात बाल विवाह पद्धती रूढ होती. त्यामुळे अनेक लहान मुलींचे प्रसुती दरम्यान मृत्यू होत होते. तसेच काही स्त्रियांचे गंभीर आजाराने मृत्यू व्हायचे. तेव्हा पत्नी मेलेल्या विधूरांनाही पुनर्विवाहास परवानगी होती. पुरूषाच्या पुनर्विवाहास तेलुगू साळी हुडकी लग्नम म्हणतात. कधी कधी विधवेस जर अगोदरच्या पतीची मुले असतील तर तीला ती सासरी सोडून दुसऱ्या पतीशी रहावे लागत असे. काही काही पती विधवा स्त्रीला आपल्या मुलांना कधीही न भेटण्याच्या अटीवर लग्न करत होते. तेव्हा त्या विधवेच्या मुलांचा सांभाळ तिच्या सासरचे लोक करत होते. मारमानम लग्नम, हुडकी लग्नम ह्या आधुनिक विचारांचा स्विकार करणाऱ्या पद्धती असल्या तरी कित्येक स्त्रियांची आपल्या मुलांच्याबाबतीत कुचंबना झाली असेल. किती तरी माता आपल्या मुलांना

भेटण्यासाठी तळमळल्या असतील. हुडकी लग्नम, मारमानम लग्नम ह्या लग्न पद्धती विधवा आणि विधुरांसाठी चांगल्या असल्या तरी विधवेच्या मुलांसाठी त्या वाईटच म्हणाव्या लागतील.

### २.४ अधिक स्त्रियांशी विवाह :

साळी समाजामध्ये अनेक धनिक विणकर होते. हे बडे आसामी दोन किंवा तीन बायकांशी लग्न करत होते. ही अधिक स्त्रियांशी लग्न करण्याची पद्धत फक्त बड्या आसामींपुरती मर्यादित होती. साळी आसामींमध्ये ''त्यावेळी जेवढ्या जास्त बायका तेवढी त्याची प्रतिष्ठा मोठी असा एक सरधोपट समत होता.''[७] अधिक हातमाग असणाऱ्या आसामींना कांड्या भरणे, पाजणी साफ करणे, ताणा जोडणे इत्यादी कामासाठी स्त्रियांची गरज असायची. ही कामं सुव्यवस्थित आणि घरच्या जबाबदारीने व्हावीत यासाठी हे आसामी अधिक स्त्रियांशी लग्नं करत होते.

### ३) कुटुंब पद्धती :

पद्मशाली समाजात बाल विवाह पद्धती रूढ होती. मुलींची लहान वयात लग्नं झाल्यामुळे त्या लहानवयात मुलांना जन्म देत होत्या. पुनरूत्पादनाचा कालावधी पुष्कळ असल्यामुळे त्या अधिक मुलांना जन्म देत होत्या. 'एका साळियाने' या आत्मचरित्राकडे पाहता साळी समाजात प्रत्येकाला चारपेक्षा जास्त मुले असल्याचे आढळते. इरय्या बोली आणि मल्लवा यांना लक्ष्मीनारायणना धरून सात मुले झाली होती. त्यातील तीन मुले दगावली. लक्ष्मीनारायण बोल्लींनाही चार मुले होती. पुन्हा दुसऱ्या पत्नीला एक मुलगी झाली. अशी पाच मुले त्यांना होती. साळीवाड्यातील प्रत्येक घरात चार पाच भाऊ एकत्र कुटुंबात राहत असल्याचे दिसून येते. अनेक विणकर तेलंगणातून सोलापूरातील साळीवाड्यात येत होते. सोलापूरात जम बसताच ते विणकर एखादे घर खरेदी करून

तेलंगणातून त्याच्या दोन-चार भावांना बोलवून एकत्र राहत होते. लक्ष्मीनारायण बोल्लीचे कुटुंबही एकत्र राहत होते. बोल्ली एका ठिकाणी आपल्या कुटुंबाचे वर्णन करतात, ''बाहेरचे कोणी घरी आले की ते हबकूनच जायचे, असं आमचं एकत्र कुटुंब, आमचे आजोबा आजी, त्यांची तीन मुलं इरय्या, अंबादास, दशरथ या तिघांच्या बायका, इरय्याची तीन मुलं, मी सत्यनारायण, मोहन. आम्हा या तिघांच्या बायका, त्यानंतर अंबादास काकांना पाच मुलं, दशरथला तीन अपत्यं, तर मला चार, सत्यनारायणला चार अपत्यं आणि मोहनला दोन म्हणजे वट्ट झाला बत्तीस लोकांचा बारदाना.''[८] यावरून साळिवाड्यात एकत्र कुटुंब पद्धतीबद्दल किती आस्था होती ते दिसून येते. लक्ष्मीनारायण शोभाशी दुसरं लग्न करून आपल्या कुटुंबापासून वेगळे झाले. बोल्लींचे वडील लहानपणापासून आपल्या भावांसह एकत्र कुटुंबात राहिले होते. वडीलांना लक्ष्मीनारायणचे कुटुंबापासून वेगळे होणे आवडले नव्हते. ते खूप दु:खी झाले होते. लक्ष्मीनारायणने आपल्या एकत्र कुटुंबातच राहावे अशी त्यांची इच्छा होती. एके दिवशी डोळ्यात पाणी आणून ही इच्छा इरय्या बोल्लींनी शोभा जवळ बोलून दाखवली. शोभाने आपल्या पतीला लक्ष्मीनारायण यांना वडीलांची इच्छा सांगितली. तेव्हा बोल्ली आपले चालते दुकान, घर सोडून पुन्हा एकत्र कुटुंबात गेले. साळी लोकांचा एकत्र कुटुंब पद्धतीवर खूप विश्वास होता हे 'एका साळियाने' आत्मचरित्र वाचताना क्षणोक्षणी जाणवतो.

## ४) धार्मिक जीवन :

पद्मशाली तेलुगू हे तेलंगणातील पद्मब्राम्हण आहेत. ते धर्माने हिंदू आहेत. हिंदू धर्मावर धार्मिकतेचा फार मोठा पगडा आहे. पद्मशाली समाजावरही धार्मिकतेचा पगडा आहे. पद्मशाली समाज हिंदू धर्मातील अनेक देव देवतांची पूजा करतो. तिरूपती बालाजी हे पद्मशालींचे कुलदैवत आहे. तसेच पाचम्मा, यलम्मा, म्हैसम्मा, पोषम्मा, बतकम्मा ह्या त्यांच्या देवता आहेत. साळी समाजाचे धार्मिक रूप अगदी सकाळी सूर्य उगवल्यापासून

पहावयास मिळते. साळी स्त्रिया रोज सकाळी घराचा उंबरा सारवून त्यावर गोपद्म आणि लक्ष्मीची पावले काढतात. या गोपद्म आणि लक्ष्मीच्या पावलांना नमस्कार करूनच त्या दिवसाची सुरवात करतात. साळी पुरूष रोज सकाळी गोपीचंदाची अंघोळ करतात. कपाळावर तिहेरी पट्ट्याचे गंध ओढतात. तसेच पट्टे छातीवरही ओढतात. दोन्ही भुजांवर गोपीचंद आणि कुंकुमाचे ठसे उमटवतात. गळ्यातील जानव्याला कुंकू लावतात. तांब्याभरून घेतलेले पाणी तुळशीला ओततात. सूर्याला नमस्कार करतात आणि आपल्या कामाला सुरवात करतात. सकाळी सकाळी एवढा पूजा विधी करणारा साळी समाज किती धार्मिक होता ह्याची कल्पना येते. प्रत्येक समाजाचे असे आपले देव देवता असतात. या देवदेवतांचे स्वतंत्र असे उत्सव साजरे होत असतात. तेलुगू साळी लोकांचेही तेलंगणी देव देवतांचे सण उत्सव असतात. हे सण उत्सव ते खास तेलंगणी पद्धतीने साजरे करतात.

## ४.१ बतकम्मा :

महाराष्ट्रामध्ये जसा गौरीचा सण आहे तसाच तेलंगण संस्कृतीमध्येही आहे. या गौरीदेवीला तेलुगू साळी लोक बतकम्मा असे म्हणतात. हा बतकम्मा सण गौरी सणासारखाच असतो. या सणादिवशी साळी स्त्रिया कमरेला डाबु, नाकात मुक्कुपोगु, गळ्यात वज्र टिक्के, पायात पट्टागोलुसुलु, कानात गेंट्यालु, हातात पाटल्या, केसात अबोलीचा गजरा असा खास तेलंगणी शृंगार करतात. सर्व स्त्रिया एखाद्या वाड्यासमोर जमतात. वाड्यासमोरील जमीन शेणाने सारवतात. त्या जागेवर आकर्षक अशा तेलंगणी रांगोळ्या काढतात. रांगोळ्यांच्या मध्यभागी रंगीबेरंगी फुलांनी भरलेले ताट ठेवतात. या ताटात हळद ओली करून तयार केलेला मूद ठेवतात. हा हळदीचा ओला मूद म्हणजेच बतकम्मा (गौरीदेवी) असते. बतकम्माची प्रतिष्ठापना केल्यानंतर सर्व स्त्रिया तिच्याभोवती गोल कडं करून टाळ्या वाजवत बतकम्माची गाणी गातात. हा कार्यक्रम अगदी सूर्य मावळेपर्यंत चालू असतो. संध्याकाळी सर्व स्त्री-पुरूष एखाद्या तलावात बतकम्माचे

विसर्जन करतात. विसर्जनानंतर सर्वजण पंगतीला बसतात आणि बतकम्माचा प्रसाद म्हणून आणलेले रव्याचे, गुळ खोबऱ्याचे, मलिद्याचे लाडू सर्वांना वाटतात. प्रसादाचे सेवन करून सर्व स्त्रिया बतकम्माचे विसर्जन गीत गात घरी जातात.

''ओंक्कोसि पुव्वेसि ......... चंदमामा

रेंड्डुजामुलाये ........... चंदमामा''[९]

(फूल वेचता एकेक...चंदमामा

दोन प्रहर टळले ....... चंदमामा)

## ४.२ गणेशोत्सव :

पद्मशाली तेलुगू संस्कृतीमध्ये गणपती हा सर्वात मोठा उत्सव असतो. सर्व साळीवाड्यातील हातमाग त्या दिवशी बंद असतात. गणेश चतुर्थीदिवशी सर्व साळी लोक आपल्या घरात गणपतीची प्रतिष्ठापना करतात. सर्व हातमाग खोलून ते गणपती समोर ठेवतात. तसेच कामाची सर्व औजारेही गणपतीसमोर ठेवतात. ह्या सर्व वस्तूंवर हळद कुंकू लावतात, फुले वाहतात. आंब्याच्या पानांचं तोरण तयार करतात. हे तोरण हातमागाच्या चौकटीला बांधतात. काही अंब्याची पानं हळदीमध्ये बुडवून सर्व साळी लोक हाताच्या मनगटावर बांधतात. गणपतीची पूजा करून स्तोत्र म्हणतात,

''व्यंकय्या व्यकय्या वेमूल ताता

कनकापंड्डु कामुनी दुप्पटी

तेल्लनि गुडिले नल्लनि व्यंकय्या

नागुलु चेईलु नमस्कारम......''[१०]

(हे व्यंकय्या नावाच्या आजोबा, तुझ्या सेवनासाठी फळ, तुझ्या सन्मानासाठी शाल आम्ही अर्पित आहोत. तेजाळ गाभाऱ्यातला तू सावळा व्यंकय्या असून, तुझ्या चार हातानं तू आम्हाला आशीर्वाद द्यावास, म्हणून तुला हा नम्र नमस्कार.)

गणपतीला तेलुगूमध्ये व्यंकय्या म्हणतात. गणेशोत्सवादरम्यान साळी लोक आपले हातमाग पुजत असल्याचे दिसून येते. तेव्हा गणपती प्रतिष्ठापना साळी लोक आपल्या उद्योगाची भरभराटी व्हावी यासाठी करत असतील असे वाटते.

पद्मशाली समाजामध्ये गणेशोत्सवाबरोबरच संक्रांत, दिवाळी, दसरा हे सण मोठ्या उत्साहाने साजरे करतात. या सर्व सणांच्या दिवशी साळीवाड्यात पार्वती देवीची पूजा केली जाते. पार्वतीदेवीचं प्रतीक म्हणून 'गोब्बेम्मा' तयार करून पुजतात. गाईच्या शेणापासून मोदकाच्या आकाराचा एक गोळा तयार केला जातो. त्याला गोब्बेम्मा असे म्हणतात. अशा तीन गोब्बेम्मा तयार केल्या जातात. त्यांच्या वरच्या बाजूला दुर्वांची जुडी खोवतात आणि त्यांना हळदी कुंकू लावतात. उंबऱ्याच्या दोन्ही बाजूला प्रत्येकी एक आणि मध्यभागी एक गोब्बेम्मा ठेवल्या जातात. गोब्बेम्मा उंबऱ्यावर बसून घरात येणाऱ्या अशुभ बाबींपासून घराचे रक्षण करते. अशी साळी लोकांची धारणा आहे. दिवाळी, दसरा, संक्रांत या सणांच्या दिवशी साळीवाड्यातील प्रत्येक घरासमोर गोब्बेम्मांची प्रतिष्ठापना केली जाते.

गौरी, गणपती, दिवाळी, दसरा, संक्रांत या सणांच्या निमित्ताने साळी वाड्यातील घराघरात गोडधोड पदार्थ केले जातात. आपल्याकडे ज्याप्रमाणे संक्रातीला गोड झालेले तोंड तिखट करण्यासाठी दुसऱ्या दिवशी किंक्रातीला मटणाचा बेत केला जातो. तसेच साळीवाड्यात सणाच्या दुसऱ्या दिवशी 'करी' नावाची मेजवानी असते. करी म्हणजे मटणाच्या जेवणाची मेजवानी. साळी लोक सणाच्या दुसऱ्या दिवशी सर्व हातमाग बंद करतात. प्रत्येक घरातून करीसाठी वर्गणी गोळा करतात. या वर्गणीच्या पैशातून सर्वांसाठी मेंढी आणतात. या मेंढीच्या मटणाचे समान वाटे घालून सर्वांना वाटतात. विणकर कामगार मालकाला मान म्हणून मेंढीची मुंडी आणि पाय देतात. मेजवानीच्यावेळी विणकर मोहाच्या फुलांपासून तयार केलेले मद्य पितात. काही विणकर कुटुंबातील स्त्रिया आणि लहान मुलेही मद्यसेवन करतात. असे स्त्रियांनी लहान मुलांनी मद्यसेवन करणे याला व्यसन म्हणता येणार नाही. कारण हा त्यांच्या तेलंगणी संस्कृतीचा एक भाग आहे.

## ४.३ मिरगम :

आपल्याकडे प्रत्येक वर्षी सात जूनला मृगाचा म्हणजे मिरगाचा सण साजरा करतात. तोच सण साळी लोकं मिरगम नावाने साजरा करतात. आपल्याकडे त्या दिवशी शेवग्याच्या पानांची भाजी करून खातात. पण साळी समाजात त्यादिवशी कोंबडीचे मटण आणि दारू पिण्याची पद्धत आहे. तेलंगणात साळी लोक पावसात भिजत आपल्या शेतात काम करत होती. ''अशा वेळी अंगात ऊब दाटवी या हेतूने असा कोंबडी दारूचा बेत आखला जायचा.''[११] तेलंगणात साळी लोकांची शेती होती. पण सोलापूरात कोणत्याही साळ्याकडे शेती नव्हती. कोणाकडेही शेती नसताना आजदेखील सोलापूरातील साळीवाड्यात हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. ''स्थळ आणि परिस्थिती बदलली तरी लोक संस्कृतीला अंतर देऊ नये, ही वृत्ती साळीवाड्यातल्या विणकरांच्या जणू रक्तातच होती.''[१२] यावरून साळी समाजाचे आपल्या संस्कृतीवर असणारे प्रेम प्रकट होते.

'मिरगम' सणादिवशी संध्याकाळी सारे विणकर आपले हातमाग आवरून रिकाम्या झालेल्या जागेत एका ओळीने बसतात. हातमागाचे मालक 'इप्पापुव्वु सारा' म्हणजे मोहाच्या फुलांची दारू आणतात. प्रत्येक विणकराला ही दारू देतात. मटण शिजेपर्यंत दारू चढलेले विणकर तेलुगू जानपद गीतांची मैफिल रंगवतात. मटण शिजल्यानंतर मटण आणि ज्वारीच्या भाकरीच्या पंगती उठतात. तेव्हा बोल्ली म्हणतात ''वास्तविक अशा पद्धतीनं मृगाची ओली पार्टी साजरी करण्याची पद्धत तेलंगणातली. तेलुगू लोकांचं तेलंगण सुटलं पण सवयमात्र सुटली नाही.''[१३]

साळी लोकांचा दिनक्रम तसेच त्यांच्या देव-देवता, सण-उत्सव पाहता त्यांच्या जीवनात धार्मिकतेला अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे दिसून येते. साळी लोक गौरी आणि गणपती या देवतांना फक्त शाकाहारी नैवेद्य दाखवतात. हे दोन देव वगळता सावित्री, यल्लम्मा, म्हैसम्मा, पाचम्मा, पोषम्मा इत्यादी देवतांना मांसाहारी नैवेद्य दाखवतात. यावरून

साळी समाजात कर्मकांडाला महत्त्व असल्याचे लक्षात येते. तसेच प्रत्येक सण उत्सवात तेलुगू लोकगीतं गायली जातात. यावरून साळ्यांच्या 'जिणं आणि गाणं' या जीवनसूत्राचा प्रत्यय येतो.

## ५) अंधश्रद्धा / समज :

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात धर्माला एक वेगळे स्थान असल्याचे दिसून येते. हिंदू धर्मातील लोकांवर धर्माचा फार मोठा पगडा आहे. धार्मिक भावनेतून लोकं अनेक देव देवतांची पूजा करतात. ह्या देवदेवता प्रसन्न होण्यासाठी त्यांना नैवेद्य दाखवणे, फुले वाहणे, नारळ फोडणे तसेच काही लोक शरीराला यातना देण्याचे अनेक प्रकार अमलात आणत असतात. या प्रकारातून अंधश्रद्धा निर्माण होत असते. देवावर अति श्रद्धा ठेवणारी माणसेच अंधश्रद्धेला बळी पडत असतात. 'एका साळियाने' या आत्मचरित्रातील साळी समाजही अंधश्रद्धेला बळी पडलेला दिसून येतो.

साळ्यांच्या घरात कोणी आजारी पडले की त्याला भूतबाधा झाली असेच समजतात. हे भूत लागलेले पाहण्यासाठी साळी लोक देवाला कौल लावतात. तेव्हा बोल्ली म्हणतात, ''यातील नव्वद टक्के कौल 'भुतानं झपाटलं' असेच लागायचे.''[१४] साळी लोकांचा समज होता की, झपाटलेली भूतं स्मशानभूमीतील असतात. म्हणून भूत उतरवण्यासाठी ते कोंबडी किंवा शेळीचा स्मशानभूमीत बळी देतात. साळी समाजात कौल लावणारी काही मंडळी होती. कौल लावणारा माणूस हाताच्या चिमटीत सूप धरून म्हणतो, ''जर भूतबाधा झाली असेल तर सूप उजवीकडून डावीकडं हलावं.''[१५] तेव्हा सूप धरलेला माणूस ते सूप नेहमी डावीकडेच हालवायचा. तसेच कौल लावण्याचा दुसरा प्रकार म्हणजे कौल लावणारी व्यक्ती जमीनीवर ज्वारी पसरून त्यावर पाण्याने भरलेला हंडा ठेवायची. त्या हंड्यावर एक पाट ठेवून त्यावर एका माणसाला बसवून म्हणायची, ''जर भूतबाधा झाली असेल तर हंडा उजवीकडून डाव्या दिशेने फिरेल.''[१६] तेव्हा हंड्यावर बसलेला

माणूस आपले दोन्ही हात जमीनीवर ठेवून डाव्या दिशेनेच फिवायचा. हे कौल लावणारी माणसं आपल्या हातचलाखीनं भोळ्या भाबड्या साळ्यांना फसवत होते. अनेकांनी साळ्यांच्या ह्या अंधश्रद्धेचा फायदा घेतला असेल.

बोल्लींच्या बहिणीच्या जन्मानंतर त्यांच्या आईला पायाच्या शिरा आखडण्याचा आजार झाला. तेव्हा बोल्लींच्या घरच्यांनी अनेक वेळा कौल लावले, कोंबडी शेळीचा बळी दिला. पण त्यांच्या आईचे दुखणे काही बरे झाले नाही. तेव्हा साळी लोक डॉक्टरांकडे जात नसल्याचे दिसून येते. असा अंधश्रद्धेवर विश्वास ठेवून साळी समाजाने अनेकांचे प्राण गमावले असतील हे स्पष्ट होते. यावरून साळी समाजात अंधश्रद्धा किती बोकाळली होती याची प्रचिती येते.

अंधश्रद्धेबरोबरच साळी समाजात काही समजही रूढ असल्याचे दिसून येते. एखाद्या बाळंतीणीचे दूध साकळले तर कोणाच्याही घरातील थोरल्या मुलग्याच्या डाव्या पायाचा तळवा तिच्या उरोजावरून फिरवायचे. उरोजावरून पाय फिरवल्याने त्या स्त्रीच्या वेदना कमी होतात आणि दूध चालू होते असा त्यांचा समज होता. साळी समाजामध्ये काही संकेतही रूढ होते. साळी समाज तेलंगणातून सोलापूरात आला होता. पण त्यांचे अनेक नातेवाईक तेलंगणात होते. तेव्हा त्यांच्यामध्ये पत्रव्यवहार चालत होता. साळी समाजात पत्राला हळदीचं बोट, काजळीचा डाग किंवा शाईचा ठिपका लावायची पद्धत होती. पत्रामधून शुभ वार्ता कळवायची असेल तर पत्रावर हळदीचं बोट लावायचे. जर पत्रातून अशुभ वार्ता कळवायची असेल तर पत्राला काजळीचा डाग किंवा शाईचा डाग लावायचे. साळी समाजातील बहुतेक लोकं अडाणी होती. हे अडाणी लोक पत्रावरील डागावरून पत्रातील शुभ अशुभ बातमीचा अंदाज लावायचे. तेव्हा लक्ष्मीनारायण बोल्ली म्हणतात, ''काही वेळा काळा डाग पाहून पत्र न वाचताच धाय मोकलून रडणारे तेलुगू विणकर मी माझ्या साळीवाड्यात खूप पाहिले.''[१७] हे संकेत साळी समाजातील अज्ञान आणि अशिक्षितपणाची जाणीव करून देतात.

साळी समाजात अंधश्रद्धा बोकाळली असली तरी काही चांगल्या प्रथाही पहावयास मिळतात. साळी लोक मुलीला लक्ष्मी आणि जावायाला विष्णू मानतात. घरात कोणतेही शुभ कार्य करतेवेळी मुलगी आणि जावायाची उपस्थिती अत्यंत महत्त्वाची असते. साळी समाजातील बापाने आपल्या मुलीच्या आणि जावायाच्या पाया पडल्याशिवाय कोणत्याही शुभ कार्याची सुरवात केली जात नाही. ''एखादा धनाढ्य बाप प्रसंगी झोपडीतल्या मुलीच्या पायावर लोटांगण घालताना दिसतो. तो याच भावपूर्ण संस्कृतीमुळे.''[१८] ही प्रथा चालू होण्यामागे जावायाने आपल्या मुलीचा चांगल्याप्रकारे सांभाळ करावा अशी भावना असेल. पण या प्रथेमुळे अनेक हेकेखोर जावायांनी आपल्या सासऱ्यांना जेरीस आणले असेल.

## ६) व्यवसाय :

साळी समाज हा मूळचा आंध्रप्रदेशातील तेलंगणचा. वस्त्र विणणे हा साळ्यांचा पारंपारिक व्यवसाय आहे. साऱ्या जगाला वस्त्र पुरवणारा साळी समाज स्वत: मात्र अर्धनग्न अवस्थेत असल्याचे दिसून येते. या त्यांच्या अवस्थेबद्दल लक्ष्मीनारायण बोल्लींनी एक लोककथा आत्मचरित्राच्या पहिल्याच पानावर दिली आहे. या कथेत लक्ष्मीदेवीने एका साळ्याला तिच्यासाठी वस्त्र विणून आणण्यास सांगितले होते. पण त्या साळ्याने वस्त्र विणून एका व्यापाऱ्याकडून देवीकडे पाठवले. देवीला साळ्याचे कल्याण करायचे होते. पण साळ्याने व्यापाऱ्याला पाठवले म्हणून देवीने पैसे व्यापाऱ्याला दिले. साळी संध्याकाळी कामं आवरून देवीकडे पैसे आणण्यास जातो. तेव्हा चिडून देवी साळ्याला शाप देते, ''तुझी भाग्यवेळ तू चुकवलीस. आता अनेक पिढ्या तुम्ही साळी लोक असेच अर्धनग्न स्थितीत, अर्धपोटी राहात, वस्त्रे विणत राहाल.''[१९] तेव्हापासून साळी समाजातील लोकं अर्धनग्न अवस्थेत असल्याचे दिसून येते. ''देवीची ही केवळ शापवाणी नाही, तर साळियांनी अर्धनग्न व अर्धपोटी राहू नये यासाठी ही चेतावणी होती.''[२०]

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

या लोककथेवरून असे लक्षात येते की, साळी लोक पिढ्यान पिढ्या प्रामाणिकपणे काम करत आले आहेत. साळ्यांच्या कामाचा फायदा त्यांना न होता व्यापाऱ्यांनाच जास्त झाला आहे. साळी समाज अगदी भोळा भाबडा आहे. ह्याच भोळ्यापणाचा फायदा व्यापाऱ्यांनी उचलला. याचा परिणाम साळी आहे त्या स्थितीतच आहेत आणि व्यापारी त्यांच्या जीवावर श्रीमंत झाले आहेत. साळी समाजात विणकरांचे काही प्रकार पहावयास मिळतात.

## ६.१ आसामी :

सोलापूरात हातमागाचे अनेक कारखाने होते. या कारखान्यांमध्ये तेलंगणातून आलेले सर्व विणकर काम करत होते. यातीलच काही विणकर आपल्या कष्टाच्या जोरावर चार, सहा, आठ, दहा मागाचे आसामी झालेले. आसामी म्हणजे हातमागाच्या मालकाला त्याच्या मागांचे आणि जागेचे भाडे देऊन त्याच्याकडूनच कच्चा माल घेऊन पक्का माल देणे. तेलंगणातून येणाऱ्या विणकरांना ही आसामी मंडळी कामं देत होती. नवीन विणकर जेव्हा तेलंगणातून आसामींकडे यायचा तेव्हा त्याचे स्वागत चांगल्या तेलंगणी पद्धतीने केले जायचे. ''प्रथम त्या विणकराला न्हाव्याकडे नेवून, त्याच्या डोक्यावरचं अस्ताव्यस्त केसांचं जंगल सपाट केलं जायचं. स्वत: मालकीण त्याच्या अंगाला खोबरेल तेल लावून घंगाळभर ऊनऊन पाण्यानं त्याला आंघोळ घालायची.''[२१] दोन दिवस त्याला आराम करायला द्यायचे आणि मगच कामावर घालवायचे. साळी समाजातील आपल्या नोकरांच्या स्वागताची ही पद्धत अतिशय चांगली आहे. या स्वागतावरून मालक आपल्या कामगारांना किती चांगली वागणूक देत होते ते लक्षात येते. अशा वागणुकीमुळे साहजिकच कामगारांना आपल्या मालकाबद्दल प्रेम, आपुलकीची भावना निर्माण होत असेल. या भावनेतूनच विणकर प्रामाणिकपणे काम करून आपल्या मालकाची भरभराटी करत असतील.

## ६.२ खटला :

पत्नीसह कामाला असणाऱ्या विणकरांना तेलुगू साळी खटला म्हणतात. या खटल्यांची राहण्याची सोय त्यांच्या हातमागाजवळच असायची. खटला विणकर म्हणजे पती-पत्नी दोघे हातमागावर राबत होते. खटल्यांच्या जेवणाच्या चुली वाड्यातील एका लांबड्या खोलीत एका ओळीने घातल्या जात होत्या. रात्री हातमागावरील कापड गुंडाळून झालेल्या जागेत हे खटले कापडाचे पार्टीशन करून झोपत होते.

## ६.३ वोंटिगाड्डु :

अविवाहीत एकटाच असणाऱ्या विणकराला तेलुगूमध्ये वोंटिगाड्डु म्हणतात. ह्या विणकरांना विणलेल्या वस्त्रानुसार मजुरी देत होते. तसेच दर बुधवारी तंबाखूची दोन पानं दिली जात होती. वोंटिगाड्डु विणकरांची जेवणाची सोय आसामींकडे पैसे देऊन होत होती. तसेच झोपण्याची सोय त्यांच्या हातमागाशेजारी. हे खटले विणकर, वोंटिगाड्डु विणकर खूप कष्टाळू होते. ''पहाटे पहाटे चिमणी किंवा कंदिल लटकावून थेट रात्रीपर्यंत उघड्या अंगाने विणकर लोक खड्ड्यात बसून साड्या विणायचे. अंघोळ जेवण आणि इतर विधीसाठी तेवढे ते खड्याबाहेर पाय काडायचे.''[२२] यावरून विणकरांची कष्ट करण्याची चिकाटी दिसून येते. विणकर स्त्रिया हातमागासाठी लागणाऱ्या सुताच्या कांड्या चरख्यावर भरतात. तसेच पाजणी करणे, सुताच्या ताणा जोडणे, ताणा साफ करणे इत्यादी कामं करतात.

साळी समाज अतिशय जिद्दी आहे. आपल्या जिद्दीच्या जोरावर अनेक विणकर आसामी झाले. काही मालक झाले आहेत. पण सामान्य विणकराकडे पाहता तो कायम कष्टात रूतून पडलेला दिसतो. १९६० च्या दरम्यान सोलापूरात यंत्रमागाचे युग अवतरले. साळी लोकांच्या हातमागावरील उत्पादनापेक्षा यंत्रमागावरील माल दर्जेदार ठरू लागला. साळ्यांचा व्यवसाय निकामी झाला. हातमागाच्या व्यवसायावर अवकळा पसरली. पण साळी समाजाच्या अंगी कष्ट करण्याची ताकद आणि चिकाटी होती. साळी समाजातील

काही हातमाग कारखानदारांनी जुन्या मिलमधील यंत्रमाग विकत घेतले आणि आपल्या बांधवांना व्यवसाय मिळवून दिला. कारखानदारांनी साळी समाजातील गोरंटला मास्तर, श्रीराम, चिन्नय्या मास्तर, सिद्रामप्पा कोंगारी मास्तर इत्यादी डिझाइनरांच्या जोरावर जागतिक बाजारपेठ काबिज केली. या डिझाइनरनी गोविंदराव जटला, व्यंकटेश जटला, देविदास येलका, अंबाजी मंगलपल्ली, अन्नलदास, मच्छा-संगा, जयंत मामड्याळ या तरूण विणकरांना आपली डिझाइनची कला शिकवली. या नव्या दमाच्या डिझाइनरनी चादरीवर निसर्ग चित्रे, फुले, नट नट्यांची चित्रे काढून जागतिक मार्केटमध्ये आपला दबदबा निर्माण केला. चादरीच्या उत्पादनात स्पर्धा निर्माण झाल्यानंतर साळ्यांनी टर्कीश टॉवेल, नॅपकीनचे उत्पादन करून संपूर्ण जगात सोलापूरचे नाव झळकवले.

## ७) स्त्री जीवन :

'एका साळियाने' मधून चित्रित झालेली साळी समाजातील स्त्री अत्यंत कष्टाळू आहे. साळी समाजात बाल वयात मुलींची लग्न होत असल्याने त्या शिक्षणापासून वंचित असल्याचे दिसून येते. १९७०-७५ सालापर्यंत अगदी बोटावर मोजण्याइतपत मुली शाळेत जात होत्या. लहान वयातच मुलींवर चूल, मूल आणि हातमागावरील कामाच्या जबाबदाऱ्या पडत होत्या. साळी स्त्रियांना वाईंडींग, पाजणी, रहाट, ताणा जोडणे, कांड्या भरणे इत्यांदी कामं करावी लागत होती. तसेच घरातील धुणी, भांडी, स्वयंपाकाबरोबर मुलांचा सांभाळ करावा लागत होता. या तेलुगू स्त्रियांचा संपूर्ण दिवस काबाड कष्ट करण्यात जात होता. यंत्रमागाने सोलापूरात शिरकाव केल्याने हातमाग व्यवसाय बंद पडला. पण कष्टाळू, जिद्दी साळी स्त्रिया गप्प न बसता विड्या वळण्याचे काम करू लागल्या. पुरूषांना काम नसल्याने त्यांनी घरात बसून दारू पिऊन पत्ते कुटण्याचे काम सुरू केले. त्यामुळे स्त्रियांना आपले कुटुंब चालवावे लागले. साळी स्त्रियांनी आपल्या मुलींना विड्यांना दोरे बांधण्यासाठी हाताखाली घेतले. घरात बसल्याने मुलींचे शिक्षण पूर्णपणे बंद झाले. यातच

२००४ साली केंद्र आणि राज्य सरकारने सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानास बंदी घातली. या कारणाने विडी उद्योगात घट झाली आणि हजारो कष्टकरी साळियांचे संसार उध्वस्त झाले.

तेलुगू पद्मशाली आसामींमध्ये दोन-तीन बायकांशी लग्न करणे प्रतिष्ठेचे मानले जाई. तेव्हा आसामींच्या सर्व बायकांना एकाच वाड्यात रहावे लागत होते. आपल्या पतीचा अनेक बायकांशी विवाह सहन करावा लागत होता. स्त्रियांची कुचंबना होत होती. येथे स्त्रिया आपल्या पतीची मर्जी सांभाळताना लाचार झाल्याचे दिसून येते.

तेलंगणातून अनेक तेलुगू विणकर सोलापूरात येत होते. सोलापूरात या विणकरांना आसामी मंडळींशिवाय दुसरा कोणाचा आधार नसायचा. तेव्हा हे मालक गरीब विणकरांच्या परिस्थितीचा फायदा घेऊन त्यांच्या बायकांशी संबंध ठेवायचे. ''मालकांच्या झब्बूशाही पुढं गरीब विणकर नांगी टाकून असायचे. मालक या बदल्यात त्या विणकराला अडचणीच्या काळात मदतीचा हात पुढे करीत असत.''[२३] येथे तेलुगू साळी समाजातील मालक लोकांचा रंगेलपणा दिसून येतो. तसेच गरीब विणकरांना आपल्या परिस्थितीमुळे स्वत:च्या बायकोशी मालकाचे संबंध सहन करावे लागत असल्याचे लक्षात येते. 'एका साळियाने' या आत्मचरित्रात मालकांनी विणकर स्त्रियांवर जबरदस्ती केल्याचे दिसत नाही. पण आपले काम जाईल, आपला आसरा जाईल, आपल्या कुटुंबाला उपाशी दिवस काढावे लागतील या भितीमुळे अनेक स्त्रिया मालकांच्या जबरदस्तीला बळी पडल्या असतील.

आजच्या पद्मशाली समाजामध्ये बरेच बदल झाले आहेत. समाजातील मुलींच्या शिक्षणाकडे लक्ष दिले जात आहे. मुलींसाठी 'भु.म.पुल्ली कन्या प्रशाला', 'बुर्ला महिला महाविद्यालय' अशा शिक्षण संस्था स्थापन केल्या आहेत. या शिक्षण संस्थातून साळी समाजातील मुलींच्या शिक्षणाची सोय केली जात आहे. पण विडी कामगारांच्या मुलींकडे पाहता श्रीमंत घरातील मुलीच केवळ शिक्षण घेत आहेत असे म्हणावे लागेल.

## ८) तेलंगणातील सामाजिक परिस्थिती :

'एका साळियाने' या आत्मचरित्रामध्ये चित्रित झालेला पद्मशाली समाज हा मूळचा तेलंगणातील आहे. या समाजाची संस्कृती तेलंगणी आहे. तेलंगणातील जमीनदारांच्या अमानुष अत्याचाराला कंटाळून हा समाज सोलापूरात आला. त्यामुळे 'एका साळियाने' या आत्मचरित्रात तेलंगणातील सामाजिक परिस्थितीचेही चित्रण झाल्याचे दिसून येते.

लक्ष्मीनारायण बोल्ली यांचे मूळ गाव तेलंगणातील गुंडाराम. या गावात बोल्लीच्या अनेक पिढ्या राहत आल्या आहेत. पण बोल्लींचे आजोबा नरसय्या हे जमीनदाराच्या अन्यायाला कंटाळून सोलापूरात आले आणि तेथेच स्थायिक झाले. गुंडाराम गावात साले (साळी), माला (महार), मादिगा (चांभार), मंगली (न्हावी), साकली (धोबी), बेस्ता (कोळी), दोम्मरी (डोंबारी), कोमट्लु (वैश्य) अशा सर्व जातीची लोकं रहात होती. पण येथेही सर्व समाजाची घरे ब्राम्हण वाड्यापासून लांब होती. म्हणजे गुंडाराम गावातही जातीभेद होता. याच गावात बोल्ली आवुला अडनावाचे लक्ष्मीनारायणांचे पूर्वज रहात होते. "बोल्ली म्हणजे धवल .... शुभ्र .... अवुलु म्हणजे गायी."[२४] बोल्लींच्या पूर्वजांकडे पांढऱ्या रंगाच्या गायी होत्या. यावरून त्यांचे अडनाव बोल्ली पडले.

### ८.१ वेठबिगार :

संपूर्ण तेलंगणात वेठबिगारीची पद्धत चालू होती. गुंडाराम गावात पेद्दादोरा नावाचा क्रूर जमीनदार होता. या गावातील शेतकऱ्यांना त्याने किरकोळ कर्ज देऊन त्यांच्या जमीनी हडप केल्या होत्या. तेलंगणातील प्रत्येक गावातील दोरा, रेड्डी, पटेलु, पटवारू यासारख्या जमीनदारांनी आपआपल्या गावातील जमीनी हडप केल्या होत्या. ज्यांच्या जमीनी हडप केल्या त्यांना त्यांच्याच शेतात वेठबिगार म्हणून ठेवले होते. या वेठबिगारांमध्ये अस्पृश्यांची संख्या जास्त होती. प्रत्येक अस्पृश्य कुटुंबातील एका व्यक्तीला वेठबिगार म्हणून दोराकडे

जाण्याची सक्ती होती. वेठबिगार पुरूषांना अहोरात्र या जमीनदारांच्या शेतात राबावे लागत होते. तर वेठबिगार स्त्रियांना जमीनदारांच्या घरातील सर्व कामं करावी लागत होती. ''या वेठबिगाऱ्याच्या पोटी जन्माला येणारा मुलगा, त्याचा मुलगा म्हणून जन्माला येत नव्हता, तर पेद्दादोराचा भावी वेठबिगार गुलाम म्हणून जन्माला येत होता.''[२५] ही जमीनदार लोकं वेठबिगाऱ्यांचा अतोनात छळ करत होती. या अस्पृश्य वेठबिगाऱ्याची अंगावर सावली पडली तर त्याची चामडी सोलली जात होती. दोराकडे नजर वर करून पाहिलं तर तापलेल्या सळीने त्यांचे डोळे फोडले जात होते. जमीनदारांचं एखाद्य म्हणणं ऐकलं नाही तर त्या वेठबिगाऱ्याच्या कानात तापलेलं शिसं ओतले जायचे. तसेच वेठबिगाऱ्याच्या जीवावर बेतणारे क्रूर असे मनोरंजनाचे खेळ ही लोकं खेळत होती. जमीनदार स्वत: बैलगाडीत बसून वेठबिगाऱ्याला गाडीला जुंपत होते. चाबकाचे फटकारे खात त्याला बैलगाडी ओढत पळवावी लागत होती. या वेठबिगाऱ्यांना छळण्यात जमीनदारांना अतिशय आनंद होत होता.

गुंडाराम गावात मानवाच्या मृत्यूची जाणीव करून देणारा 'पुलीआटा' हा खेळ खेळला जात होता. पुलीआटा म्हणजे वाघांची झुंज. या खेळामध्ये गुंडाराम गावातील एका व्यक्तीची शेजारच्या गावातील व्यक्तीशी झुंज लावली जात होती. खेळ सुरू करण्यापूर्वी या दोन व्यक्तींच्या उघड्या अंगावर वाघासारखे पट्टे ओढले जातात. लंगोटीला कापडापासून तयार केलेल्या शेपट्या लावतात. एका हातात लाल रूमाल आणि दुसऱ्या हातात लिंबू बांधला जातो. बंदुकीचा बार उडताच हे वाघ हातातील लिंबू दाताखाली चिरडून एकमेकांवर तुटून पडतात. हलगी वाजवून खेळाची रंगत वाढवली जाते. दोन्ही वाघापैकी एकाचा मृत्यू झाल्यानंतरच हा खेळ थांबतो. असा हा जीवघेणा खेळ दोरांच्या प्रतिष्ठेचा होता. दोन गावातील दोरांची प्रतिष्ठा पणाला लागायची पण हकनाक एखाद्या गरीबाचा जीव जात होता. ''माणसाच्या जीवाची किंमत दोरांच्या दृष्टीत किड्या-मुंग्याहून निपत्तर होती. गुलामांना झुंजवून प्रसंगी त्यांचा मृत्यू पाहणे हा त्याचा विकृत आनंदाचा भाग

होता. शिकारी सावजाला टिपल्यानंतर जसा देहभान हरपून चित्कारतो तसा आनंद त्याला वाटायचा."[२६] ह्या पुलीआटाच्या खेळासाठी लक्ष्मीनारायण बोल्लींचे आजोबा नरसय्या बोल्लीचे नाव जाहीर झाले तेव्हा नरसय्या गुंडाराम गाव सोडून सोलापूरात आले. नरसय्याने स्वत:चा जीव वाचवण्यासाठी पळून जाण्याचे धाडस केले. पण या खेळात अनेक निष्पाप जीवांचा बळी गेला आहे. अनेकांच्या आई वडीलांनी आपल्या मुलाचा मृत्यू स्वत:च्या डोळ्यांनी पाहिला असेल. अनेकांची मुले बेवारशी आणि बायका विधवा झाल्या असतील.

## ८.२ नववधूला भोगण्याची परंपरा :

तेलंगणातील गावागावात नववधूला भोगण्याची अमानुष परंपरा अस्तित्वात होती. गावात ज्यावेळी एखाद्या वेठबिगाऱ्याचं लग्न व्हायचं त्यावेळी ही दोरामंडळी त्याच्या नववधूला भोगायचे. या नववधूला लग्नाची पहिली रात्र दोरांच्या वाड्यावर घालवावी लागत होती. ह्या नववधू स्वत:च्या मनाने नाही गेल्या तर त्यांना जबरदस्तीने उचलून दोराकडे नेले जात होते. नवीन लग्न झालेल्या नव्या नवरीला रात्रभर दोराच्या वासनेला बळी जावे लागत होते. स्वत:च्या भावी आयुष्याची स्वप्न बघणाऱ्या स्त्रीला दोरांचा अत्याचार सहन करावा लागत होता. तसेच दुसऱ्या दिवशी सकाळी नववधूच्या नवऱ्यालाच तीला आणण्यास जाण्याची प्रथा होती. या प्रथेवरून नव्या नवरा-बायकोला किती वेदना सहन कराव्या लागल्या असतील याची जाणीव होते. दोरांच्या भितीमुळे कितीतरी युवक-युवती अविवाहीत राहिले असतील. अनेकांनी तर लग्न करण्याचा स्वप्नातदेखील विचार केला नसेल. जेव्हा जमीनदारांच्या मुलींची लग्न व्हायची त्यावेळी वेठबिगाराच्या मुलींना त्यांच्या सेवेसाठी त्या मुलींच्या सासरी रहावे लागत होते. तेव्हा "तिथली सासरची जमीनदार गुलछबू मुलं या वेठबिगार मुलींना रखेल्या म्हणून वापरत."[२७] वेठबिगारांची सावली जरी अंगावर पडली तर त्यांची चामडी सोलून काढणारे जमीनदार त्यांच्या स्त्रियांना मात्र

मनसोक्त भोगत होते. अशावेळी ते कोणतीच अस्पृश्यता पाळत नव्हते. यावरून त्यांच्या वासनिक प्रवृत्तीचेच दर्शन घडले आहे.

### ८.३ क्रांतीकारी लढा :

तेलंगणातील दोरा, पटेलु, पटवारी, रेड्डी यासारख्या जमीनदारांकडून वेठबिगारांचा अनेक वर्षे छळ केला जात होता. वेठबिगारांच्या अनेक पिढ्या या अन्यायाला बळी पडल्या होत्या. या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम १९६७ साली वरंगल जिल्ह्यातील कोंडापल्ली सीतारामय्याने केले. सीतारामय्या एक शिक्षक होते, त्यांनी अनेक युवकांना हाताशी धरले. या युवकांच्या अनेक टोळ्या तयार केल्या. ह्या टोळ्या अनेक धनिकांना लुटू लागल्या. लुटीतील संपत्ती गरीबांना वाटू लागले. अनेक जमीनदारांचे हातपाय त्यांनी तोडले. वेळप्रसंगी अनेकांना ठार मारले. तेव्हा ''लोक त्यांना पीपल्स वॉर ग्रुप नक्षलवादी म्हणून ओळखू लागले.''[२८] यावरून असे लक्षात येते की आज तेलंगणातील नक्षलवादी म्हणून गणले गेलेले दुसरे तिसरे कोणी नसून हेच दलित, पिडीत आहेत. आज एकवीसाव्या शतकातदेखील तेलंगणातील दलित, पिडीतांवर अन्याय चालूच आहे. म्हणून स्वतंत्र तेलंगणाची मागणी होत आहे ती योग्यच आहे असे म्हणावे लागेल.

### ९) सामाजिक कार्यातून संस्कृती दर्शन :

'एका साळियाने' या आत्मचरित्रामध्ये अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि त्यांच्या कार्याचे चित्रण झाले आहे. साळी समाजातील अनेकांनी सामाजिक कार्यातून आपल्या समाजाबरोबरच मराठी समाजाचाही उत्कर्ष केला आहे. साळी समाजातील कार्यकर्त्यांनी आपल्या कार्यातून तेलुगू संस्कारांची, आपुलकीची जगाला ओळख करून दिली आहे. अनेक प्रसंगातून त्याचा अनुभव येतो.

एकदा साळीवाड्यातील एका विहिरीत यरगुंटा नावाच्या म्हाताऱ्याचा मृत्यू झाला होता. सोलापूरात या म्हाताऱ्याचे कोणीच नव्हते. कोणीही त्याच्या अंत्यविधीची जबाबदारी घेण्यास तयार होईना. तेव्हा विठोला बुर्गुल हे वृद्ध गृहस्थ पुढे आले आणि म्हणाले, "गेलेला माणूस हा आपल्या पद्मशाली वंशाचा आहे. आज आपला समाज सोलापूरात लाखाच्या घरात आहे. तेव्हा त्याचा अंत्यविधी एखाद्या बेवारशी कुत्र्या, मांजराप्रमाणे व्हावा, हे आपल्या वंशाला शोभून दिसणार नाही. माणूस कुणीही असो, पण माणुसकीचा धर्म एकच आहे."[२९] बुर्गुलांनी प्रेतापुढं मडकं धरलं. चितेलाही त्यांनीच अग्नी दिला. यावरून पद्मशाली लोकांना आपल्या समाजाबद्दल किती आपुलकी होती याचे दर्शन घडते. तसेच त्यांच्यातील माणुसकी दिसून येते.

लक्ष्मीनारायण बोल्लींचे वडील भावनाऋषीपेठेतील साळी समाजाचे 'मुखीया' होते. पावसाळ्याच्या दिवसात तेथे चोऱ्या व्हायच्या. खांबावरील म्युनिसीपालिटीच्या कंदीलातील रॉकेल वडार लोक काढून घेत होते आणि अंधारात चोऱ्या करायचे. वडरांची साळीवाड्यात खूप दहशत होती. साळ्यांच्या घरातील सांसारिक साहित्याच्या चोऱ्या व्हायच्या. तेव्हा अनेक विणकर इरय्यांकडे रडत जायचे. इरय्याला हे सहन होत नव्हते. तेव्हा इरय्या म्युनिसिपालिटीच्या अधिकाऱ्याकडे एका रात्री खांबावर लाईट बसवण्याची मागणी करण्यासाठी गेले. अधिकाऱ्याने सकाळी येतो म्हणत दार लावून घेतले. पण इरय्या घरी न जाता रात्रभर त्या अधिकाऱ्याच्या दारात बसले. दुसऱ्या दिवशी सकाळी अधिकाऱ्याने त्यांना दारात पाहिले आणि चकित झाले. साळीवाड्याची पाहणी करून त्या अधिकाऱ्याने लगेच तेथे विजेचे दिवे लावले. इरय्या रात्रभर घराकडे आले नाहीत म्हणून सारा साळीवाडा सकाळपर्यंत जागत राहिला. कधी कधी काही गुंड प्रवृत्तीची पोरं साळीवाड्यातील मुलांच्या शेंड्या ओढायचे, गल्लीत बांधलेले सूत कापायचे, स्त्रियांची छेड काढायचे. तेव्हा इरय्यांनी 'भावनाऋषीपेठ तालीम संघ' नावाचा आखाडा तयार केला. तालमीत ते स्वत: वस्ताद झाले. समाजात अनेक तरूणांना पैलवान बनवले आणि त्या

गुंडांना त्यांनी धडा शिकवला. साळी समाजाबद्दल इरय्या बोल्लींना किती आपुलकी, तळमळ होती हे यावरून दिसून येते. तसेच साळी समाजानेही आपल्या मुखियाची तळमळ ओलखून त्यांना महापौर होईपर्यंत साथ दिली. महापौर झाल्यानंतर इरय्या बोल्लींनी साळीवाड्यासोबत संपूर्ण सोलापूरचा विकास साधला.

इरय्या बोल्ली हे सोलापूरचे महापौर झाले होते ही ख्याती तेलंगणापर्यंत पोहचली होती. तेलंगणातून अनेक लोककलावंत इरय्याकडे येत होते. इरय्या त्यांचे कार्यक्रम साळीवाड्यात ठेवत होते. या कलावंतांना ते नेहमी आर्थिक मदत करत होते. इरय्या बोल्ली हे पद्मशाली ब्राम्हण होते. पण तरीही अनेक वेळा धनगरी लोककथा, लोकगीते, तसेच यल्लम्मा ही अस्पृश्यांची देवता तिच्याही लोकगीतं आणि लोककथांचे कार्यक्रम ठेवत होते. यावरून इरय्या बोल्ली या सामाजिक कार्यकर्त्याची कोणत्याही प्रकारचा जातीभेद मानत नसल्याची वृत्ती दिसून येते.

विठोबा वड्डेपल्ली हे साळिवाड्यातील एक प्रतिष्ठित व्यक्ती होते. विठोबांना आपल्या समाजाबद्दल खूप कळवळा होता, आपुलकी होती. तेलंगणातून अनेक विणकर सोलापूरात यायचे. सोलापूरात त्यांच्या ओळखीचे कोणीही नसायचे. तेव्हा विठोबा अशा विणकरांना स्वत: काम शोधत होते. काम मिळेपर्यंत त्याची राहण्या-खाण्याची सोय स्वत:च्या घरात करायचे. लक्ष्मीनारायणांचे आजोबा तेलंगणातून सोलापूरात आले. सोलापूरात त्यांचे कोणी नव्हते, तेव्हा ते विठोबांना भेटले. नरसय्याने विठोबांना कामाची गरज असल्याचे सांगितले. तेव्हा विठोबा आपल्या नोकराला हाक मारून म्हणाले, ''अरे रंगय्या...... नरसय्याला आत घेऊन जा. त्याच्या आंघोळपाण्याची, नाष्टा जेवणाची नीट व्यवस्था कर आणि वरच्या गच्चीवर त्यांचा बिस्तरा लावून दे.''[३०] विठोबांनी अनेक निराधारांना आधार दिला होता. अनेकांना संसाराला लावले होते. विठोबांनी आपल्या समाजातील लोकांना थारा दिला नसता तर नरसय्या सोलापूरात राहिले नसते, इरय्या सोलापूरचे महापौर झाले नसते. कदाचित लक्ष्मीनारायण बोल्लींचे 'एका साळियाने' हे

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आत्मचरित्र उदयास आले नसते आणि जगाला साळी समाजाची तेलंगणी संस्कृती समजली नसती.

**निष्कर्ष :**

प्रस्तुत प्रकरणात 'एका साळियाने' या आत्मचरित्राचा सामाजिकतेच्या अंगाने अभ्यास केला आहे. यामध्ये साळी समाजातील कुटुंब व्यवस्था, विवाह पद्धती, साळ्यांचे धार्मिक जीवन आणि व्यावसायिक जीवनाचा आढावा घेतला आहे. तसेच तेलंगणातील सामाजिक परिस्थितीचा आढावा घेता काही निष्कर्ष हाती आलेले आहेत.

'एका साळियाने' या आत्मचरित्रामध्ये चित्रित झालेला साळी समाज तेलंगण आणि महाराष्ट्राच्या सीमारेषेवरील समाज आहे. साळी समाजाने महाराष्ट्राच्या संस्कृतीचा स्वीकार केला आहे पण तेलंगणी संस्कृतीला त्यांनी कधी अंतर दिलेले नाही. हा तेलुगू पद्मशाली समाज अत्यंत धार्मिक आहे, त्यांचे संपूर्ण जीवन धर्मावर आधारलेले आहे. हे लोक अनेक तेलंगणी देवदेवतांचे सण-उत्सव साजरे करतात. या समाजात अंधश्रद्धेवर विश्वास ठेवून प्राण्यांचे बळी दिले जातात. भारतीय समाज व्यवस्थेने नाकारलेल्या विधवा विवाहाचा स्वीकार हा समाज करतो. तेलुगू साळी विभक्त कुटुंबाचा विचारदेखील मनात आणत नाहीत. चादरी आणि साड्या विणण्याचे कौशल्य या समाजाच्या रक्तात आहे. नववधूला भोगण्याची अमानुष परंपरा तेलंगणात होती. वेठबिगारांच्या जीवनाशी क्रूरपणे खेळ करणारे जमीनदार माणुसकीला काळीमा फासणारे आहेत. तेलुगू कार्यकर्ते स्वतःचा विचार न करता संपूर्ण समाजाचा विचार करणारे आहेत. म्हणून प्रस्तुत आत्मचरित्र हे लेखकाच्या जीवनातील सुखदुःखाची गाथा न होता ती संपूर्ण साळी समाजजीवनाची गाथा होते. या आत्मचरित्रात येणारे लेखकाच्या जीवनातील संदर्भ हे समाजाच्या पातळीवर जातात. शेवटी 'एका साळियाने' हे आत्मचरित्र एकट्या बोल्लींचे न रहाता संपूर्ण साळी लोकांचे होते.

# संदर्भग्रंथ सूची


१. भंडारी शांतिलाल : 'एका साळियाने काढला तेलगु साडीवर मराठी काशिदा', साहित्य, २१, नवी वाडी, दादीशेट अग्यारी लेन, मुंबई २, पृ.क्र. २८.

२. बोल्ली लक्ष्मीनारायण : 'एका साळियाने', पद्मगंधा प्रकाशन, ३६/११, धन्वंतरी सह. गृह. संस्था, पांडुरंग कॉलनी, एरंडवन, पुणे - ४११०३८, पृ.क्र. १२९.

३. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. ६

४. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. ६

५. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. २०१

६. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. २०१

७. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. १००

८. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. १९९

९. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. २९

१०. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. ८६

११. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. १२८

१२. भंडारी शांतीलाल : 'एका साळियाने काढला तेलगू साडीवर मराठी कशिदा', साहित्य, २१, नवी वाडी, दादीशेट अग्यारी लेन, मुंबई २, पृ.क्र. ३४

१३. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. १२८

१४. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. १०८

१५. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. १०८

१६. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. १०८

१७. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. ६

१८. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. ७

१९. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. ३

२०. भंडारी शांतिलाल : 'एका साळियाने काढला तेलगु साडीवर मराठी कशिदा', साहित्य, २१, नवी वाडी, दादीशेट अग्यारी लेन, मुंबई २१, पृ.क्र. ३०.

२१. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. १००

२२. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. १००

२३. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. १०१

२४. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. १६

२५. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. १५

२६. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. २१-२२

२७. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. १५८

२८. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. २७५

२९. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. १०९

३०. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव. पृ.क्र. ३१